# ऋणनिर्देश

कोणतेही कार्य प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशा अनेकांच्या सहकार्यनेच पार पडते. श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत करांगुलीने उचलला तरी त्याला देखील अनेक गोपालांचे हात मदतीस होते. तेव्हा संशोधनासारखे काम देखील "फक्त मीच केले" हे म्हणणे योग्य नाही. त्या कामात मला प्रेरणा, प्रोत्साहन, सहकार्य ज्यानी ज्यानी केले, त्या सर्वांचा ऋणनिर्देश येथे करणे उचित आहे.

मला प्रेरणा देणारा परमेश्वर आणि प्रतिपरमेश्वराप्रमाणे माझ्या पाठीशी असणारे कै. मातापित्यांचे आशीर्वाद मला लाखमोलाचे वाटतात. वयोवृध्द सासूबाई आणि इतर गुरुजनांच्या सदिच्छा यांचे मूल्य तर करतांच येणार नाही. सासरच्या मंडळींनी मला मनापासून सहकार्य केलेले आहे.

माझ्या जीवनसाथीची मला माझ्या कामात सर्व प्रकारे मदत झाली. तसेच डॉ. अ. ह. साळुंखे यांनी योग्य ते प्रोत्साहन दिले. व गुरुवर्य डॉ. वि. बा. इनामदार यानी संशोधनातील त्रुटी समजावून योग्य दिशेने प्रयत्न करण्यास चालना दिली. म्हणून त्यांचे मी आभार मानते.

विलिंग्डन कॉलेजचे प्रभारी प्राचार्य बोडसकर व सध्याचे प्राचार्य डॉ. निमकर यांची या कामात मला अनुमती मिळाली. ग्रंथपाल श्री. रास्ते व ग्रंथालयातील इतर कर्मचारी यांची वेळोवेळी पुस्तकांच्या बाबतीत खूपच मदत झाली. पार्वती टाईपिंग सेंटर यांनी काम दर्जेदार करून दिले.

तसेच साताराच्या कॉलेजात एम्.फिल्.साठी प्रवेश घ्यावा लागल्याने तेथे राहणा-या माहेरच्या सर्व मंडळींचा सहभाग त्यात आहेच.

आणि प्रामुख्याने माझ्या मार्गदर्शिका डॉ. श्रीमती सुहासिनी राजेभोसले यानी अत्यंत आपुलकीने, आवश्यक असे मार्गदर्शन केले.

या सर्वांचे ऋण व्यक्त करताना मला खूपच कृतज्ञता वाटते.

– सौ. योगिनी यशवंत जोशी.

# अनुक्रमणिका

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १] | प्रास्ताविक | १ |
| २] | उपनिषत्कालीन शिक्षण | ६ |
| | अ] शिष्य परीक्षा | |
| | ब] सद्‌गुरुची निवड | |
| | क] अधिकारी शिष्य व त्याचे अध्ययन | |
| ३] | गुरुकुलपध्दती | ३८ |
| ४] | शैक्षणिक व सामाजिक नियम | ४६ |
| ५] | आदर्श शिष्य व आदर्श गुरु | ६४ |
| ६] | शिक्षण संक्रमण - | ८० |
| | अ] शिक्षण पध्दती - जुनी व नवी तुलनात्मक अभ्यास | |
| | ब] चांगली शिक्षण पध्दती- आजच्या काळाची गरज | |
| ७] | उपसंहार | ८७. |

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## -: प्रस्ताविक :-

प्राचीन हिंदू संस्कृती इतर कोणत्याही संकृतीपेक्षा सर्वश्रेष्ठ ठरली; त्याला अनेक कारणे आहेत. भारतीय संस्कृतीला इतर संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ नैतिक व सामाजिक मूल्ये आहेत. त्या मूल्यांना पायाभूत ठरणारा "गुरु-शिष्य संबंध" अतिशय महत्वाचा आहे. असा "गुरु-शिष्य संबंध" अन्य संस्कृतीत सापडणार नाही म्हणूनच भारतीय संस्कृती जगामध्ये अत्युच्च स्थानी टिकून राहिली आहे.

भारतीय शिक्षणपध्दतीत गुरुशिष्यसंबंध फक्त व्यावहारिक नाही. अध्ययन अध्यापन क्रियेखेरीज बरेच काही या गोष्टीने साध्य झाल्याचे दिसते. "गुरू" हा अतिशय ज्ञानी असून शिष्याला तो शहाणे करुन सोडतोच. पण याखेरीजही शिष्याचे संपूर्ण व्यक्तिमत्व घडविणे, त्याला सुसंस्कारित करणे या गोष्टीनाही गुरूच्या लेखी अतिशय महत्व आहे. जे संस्कार निर्जीव ग्रंथ करु शकत नाहीत, गुरुशिवाय अन्य कोणीही तितक्या परिणाम-कारक रीतीने ते करु शकत नाहीत म्हणूनच गुरुचे माहात्म्य श्रेष्ठ आहे. त्याची तुलना कोणाशीच करणे अशक्य प्राय आहे. गुरू व शिष्य यांच्या संबंधाला एक वेगळेच परिमाण प्राप्त झालेले आहे.

अध्ययन - अध्यापन याखेरीज इतर सर्वच बाबतीत गुरु आणि शिष्य यांचा संबंध असल्याचे फार प्राचीन काळापासून आढळते. तो संबंध उपनिषदापूर्वीही होता. त्यानंतरही तो मोठ्याप्रमाणात असल्याचे पुराणादि वाङ्मयातून दिसून येते. विद्यार्थी हा समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा घटक आहे. फार पूर्वीपासून त्याचा विचार अनेक विचारवंतानी केलेला आहे. आजच्या बदलत्या काळातही त्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

"गुरुशिष्य संबंध" हा विषय अतिशय विस्तृत आहे. वैदिक काळापासून तो आहे. म्हणूनच तो अतिशय महत्वाचा आहे. पारंपारिक विषय आहे. त्यातील एक भाग म्हणून "उपनिषत्कालीन गुरुशिष्य संबंध" हा मर्यादित विषय मी लघुशोधनिबंधासाठी निवडलेला आहे.

प्राचीन ऋषीमुनी तपश्चर्याकरून ज्ञानसाधना करीत असत. त्यायोगे ब्रह्मप्राप्ती करून घेत असत. आपले हे ज्ञान जिज्ञासू शिष्याला देण्यात त्याना आनंद वाटत असे. गुरुशिष्यांचे हे संबंध जितके जिव्हाळ्याचे तितके ते अधिक परिणामकारक होतात. कालानुसार हे संबंध कसे बदलत गेले, उपनिषदाच्या काळात ते कसे होते याचा विचार प्रस्तुत लेखनात मी केलेला आहे.

प्राचीन काळी "गुरु" ही संस्था श्रेष्ठपदाला पोचलेली होती. वैदिक काळापासून हिंदुस्थानात शिक्षणक्षेत्रात गुरुचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यावर सुसंस्कार करणे, चांगल्या तऱ्हेचे आदर्श जीवनमान घडविणे, जीवनात जास्तीत जास्त ज्ञान, आनंद समाधान मिळविणे त्यात आयुष्याचे सुख - श्रेयस मानणे, स्वत:बरोबर दुसऱ्यानाही जीवनाचा आनंद, समाधान देण्याचे त्यागी जीवन जगणे, ज्ञानज्योतीने असंख्य दीप प्रज्वलित करणे हे गुरुचे जीवन होय. असे हे गुरु म्हणजे शिष्याचे सर्वस्व, शिष्याचा आदर्श, सर्वतोपरी मार्गदर्शक असायचे, हे योग्यच होय. जीवनाची वाटचाल करताना शिष्याच्या जीवनमार्गात ते दीपस्तंभाप्रमाणे असत. अशा या गुरुना आज देखील अनन्यसाधारण महत्व आहे.

एक कवी म्हणतात - गुरु माझा भ्राता गुरु माझा पिता
गुरु माझा भर्ता जिवलग
गुरु माझा मित्र गुरु माझे गोत्र
गुरु माझा पुत्र आत्मरूप
गुरु माझा मंत्र गुरु माझे तंत्र
गुरु माझे पंथ निर्वाणीचे
आत माझा गुरु बाह्य माझा गुरु
अवघेच गुरु रस म्हणे

अशा या थोर गुरुंकडे विद्याप्राप्तीसाठी शिष्य जात असते.

विद्यार्थ्याच्या या विद्यार्थी जीवनाची सुरुवात मातापिता यांच्या सहवासात जरी होत असली तरी खऱ्या अर्थाने उपनयन संस्कारानंतर गुरुगृही जाऊन त्याचे शिक्षण सुरु होत असे. उपनयन संस्काराने त्याला ज्ञानार्जन करण्याची पात्रता लाभत असे. असा शिष्य गुरुगृही जाऊन नम्रतेने आचरण करुन, गुरुंची मनोभावे सेवा करुन गुरुंच्या कृपाप्रसादाने विद्याध्ययनास सुरुवात करीत असे. विद्यार्जनाचे व संस्कृतीरक्षणाचे हे कार्य अतिशय पवित्र असे आहे. त्यासाठी विद्यार्थी जीवनात विद्यार्थ्यावर अनेक बंधने आहेत. ब्रह्मचर्यव्रत पालन, इंद्रिय निग्रह, सुखासीनतेचा त्याग, शुध्द अंत:करण, सच्चरित्र, गुरुवर व ज्ञानावर श्रध्दा व भक्ती, तीव्र ज्ञानलालसा व दुर्दम्य उत्साह, नम्रता इ. गोष्टी विद्यार्थ्यात आवश्यक असत. गुरूंचे आज्ञापालन करणे हे विद्यार्थ्याचे कर्तव्य असे. त्यात कुचराई झाल्यास शिक्षा होत असे.

अशा तऱ्हेने समाजापासून दूर राहून, मोहापासून अलिप्त राहून चित्त एकाग्र केल्याशिवाय विद्याग्रहण होत नसे. निसर्गाच्या सहवासात, गुरुंच्या सेवेत विद्यार्थ्यावर चांगले संस्कार होत. त्यामुळे शरीर-मन-बुध्दी

या तिन्हींचा विकास विदयार्थी जीवनात योग रीतीने होत असे: दुर्वर्तनाला तेथे जागा नसे. विदयार्थी दशेपासून निरोगी व सुदृढ जीवनाचा पाया भरभक्कम तयार होत असल्याने समाजाची भावी पिढी सुसंस्कारित, निरोगी सुखी व आनंदी होण्यास नियंत्रित विदयार्थी जीवन पोषक ठरत असे.

निस्वार्थी बुध्दीने गुरूजन विद्यादानाचे सतत कार्य करीत असत. विनावेतन, समाजसेवा या विशाल भावनेतून हे काम चालत असे. त्यामुळे समाजही गुरूंकडे अतिशय आदराने पहात असे. राजे लोक देखील या विद्वानांची कदर करीत. त्यामुळे गुरूंना अतिशय मानाचे स्थान होते, हे योग्यच आहे.

गुरूंची ही विद्वत्ता व हे कार्य पाहून राजेलोक त्यांच्या उदर-निर्वाहाकरिता काही गावे इनाम म्हणून देत असत. त्या गावांच्या उत्पन्नातून, अध्ययन - अध्यापनाकरिता त्या गुरूंनी खर्च करायचा. अशा गावाना "अग्रहार" अशी संज्ञा आहे. याठिकाणी गुरू आपले जीवन विद्याभ्यास व विद्यादान याकरिता व्यतीत करीत असत.

या गुरूंच्या आश्रमात किंवा गुरूकुलमध्ये विद्यार्थ्याला १२ ते १४ वर्षे शिक्षणासाठी रहावे लागे. त्याचे शिक्षण संपल्यानंतर समावर्तनाचा विधी सांगितलेला आहे. त्यावेळी हे गुरू आपल्या शिष्याना नुसता निरोप देत नसत तर "सत्यं वद। धर्मं चर। .." इ. जीवनोपयोगी संदेश देत असत. हा बहुमोल उपदेश, ज्ञानाची शिदोरी शिष्याला आयुष्यभर मार्गदर्शक ठरत असे. गुरूंच्या आदरापोटी कृतज्ञता म्हणून, त्याना यथाशक्ती गुरूदक्षिणा देण्याची प्रथा होती. जमिन, सोने, गायी, घोडे, छत्री, जोडे, आसन, भाजी, कपडे इ. दक्षिणारूपात देऊन गुरूना संतुष्ट करण्यात

येत असे. मनुस्मृति म्हणते – "क्षेत्रं हिरण्यं गामश्वं छत्रोपानहमासनम्।
धान्यं शाकं च वासांसि गुरवे प्रीतिमावहेत्॥"

[अ. २३ लो. २४६]

ही गुरुकुल संस्था बरीच वर्षे मोठ्या प्रमाणात भारतात अस्तित्वात होती. आजही अगदी थोड्याप्रमाणात काहीठिकाणी ती चालू आहे. रवींद्रनाथ टागोरांच्या शिक्षणपध्दतीच्यारूपाने शांतिनिकेतन येथे ती अस्तित्वात आहे. सुमारे आठव्या शतकापासून शिक्षण हे वेतन घेऊन शिकविण्यात येऊ लागले, त्याला भृतक अध्यापन असे म्हणतात. विद्येच्या स्वरूपात हे विद्यावेतन ठरविण्यात येत असे. त्यानंतर मोठ्या प्रमाणात शिक्षणसंस्था निघाल्या. परकीय आक्रमणे झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांचे जीवन व शिक्षणपध्दतीत बदल होत गेला. शिक्षणाचे उद्दिष्ट बदलत गेले. शिक्षणक्षेत्रात पूर्वी "गुरू" हा केंद्रबिंदू होता तर आज "विद्यार्थी" हा शिक्षणाचा केंद्रबिंदू आहे. एकंदरीत शिक्षक – विद्यार्थी यांचे जिव्हाळ्याचे संबंध असणे आवश्यक. म्हणून "गुरुशिष्यसंबंध" हा विषय आजही सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. म्हणूनच "उपनिषत्कालीन गुरुशिष्यसंबंध" हा अभ्यासाचा विषय प्रस्तुत ठिकाणी मी खुलासेवार मांडला आहे.

– – x – –

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR